म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय : बा.ग्रा.
क्र. : ३०६०६

IRBK-0130606

# गोष्टी पुरून उरणाऱ्या

## भाग : २

पुरुषोत्तम धाक्रस



IRBK-0130696

रोहन प्रकाशन

संस्थापक : मनोहर चंपानेरकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
सरस्वती मंदिर, सुभाष पथ,
स्टेशन रोड, जिल्हा परिषदे समोर,
ठाणे-४०० ६०१

गोष्टी पुरून उरणाऱ्या (भाग : २)
प्रथमावृत्ती : नोव्हेंबर १९९९
© सौ. इंदुमती धाक्रस

□

प्रकाशक/मुद्रक
प्रदीप चंपानेरकर
रोहन प्रकाशन
३९६ ब नारायण पेठ, १ ला मजला
पत्र्या मारुती चौक, पुणे ४११ ०३०
✆ पुणे ४४८०६८६ ✆ मुंबई ८७२७४७७

□

मुखपृष्ठ / रेखाचित्रे
गोपाळ नांदुरकर

□

अक्षरजुळणी
एच. एम. टाइपसेटर्स, पुणे ४११०३०

□

मुद्रणस्थळ
स्मिता प्रिंटर्स
१०१९ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

□

मूळ मूल्य : पंधरा रुपये
**खास सवलतीत बारा रुपये (Rs. 12/-)**

# अनुक्रमणिका

टिंबक्टू / ५

वाघबच्चा फाकडा! / १३

काव काव नाही– कुहू कुहू! / २१

झुंबररावांचा कर्दनकाळ! / २९

पडत्या फळाची आज्ञा / ३७

***

# या गोष्टींची गोष्ट !

तर या आहेत गोष्टी पुरून उरणाऱ्या ! म्हणजे कळलं ना? यातली कुठलीही गोष्ट वाचून झाली तरी मनात रेंगाळतेच. तिच्यातलं काही ना काही, कुणी ना कुणी आठवत राहतं.

आता हेच पाहा ना– या गोष्टीतला 'टिंबक्टू' केवढा छोटा आहे? पण कितीही कुत्रे अंगावर आले तरी मागं हटतो का? त्या सर्वांशी फाइट देतो आणि त्यांना पुरून उरतो. आणि आपणाला दाखवून देतो की प्रसंग कसाही असला तरी शक्ती, युक्ती, धाडस या सर्वांचा उपयोग करून बिकट प्रसंगातून तरून जायचं. रडत बसायचं नाही.

कावळ्याची मोटार, अंजूची मंजू, झुंबररावांचा कर्दनकाळ इत्यादी सर्व गोष्टी मनोरंजनाबरोबर तुम्हांला असंच काही ना काही देतील, नवा अनुभव देतील. अशा अनुभवांचा साठा तुमच्या डोक्यातला 'कॉम्प्युटर' आपल्या पोटात भरून ठेवील, तुम्हांला मोठं होताना हवा तेव्हा यातला एकेक अनुभव काढून देईल. लक्षात ठेवा, ज्याच्या गाठी अनुभवांचा साठा, तोच माणूस बनतो मोठा!

'गोष्टी पुरून उरणाऱ्या' या पुस्तकातल्या गोष्टी दोन भागांत दिल्या आहेत. हा गोष्टींचा खजिना आहे आयुष्यभर पुरणारा, कठीण प्रसंगात सोबत करणारा, मुलांना मोठी माणसं करणारा ! तर अशा या गोष्टी वाचून पाहा, आणि खालील पत्त्यावर कळवा– पुरून उरणाऱ्या आहेत की नाहीत ते. बरं का?

१०२ अ सरोजिनी सोसायटी,
लोकमान्य कॉलनी, पौड रोड,
पुणे ४११०३८.

– लेखक
**पुरुषोत्तम धाक्रस**

# टिंबक्टू

आमच्या कॉलनीत ना, एक मुलगा आहे. त्याचं नाव प्रथमेश. छान, छोटा, गोरा पान! म्हणतो, आय ॲम द ही म्यान! पहिलीत जातो, पहिला नंबर काढतो. जोका मारतो, सर्व मुलांना हसवून सोडतो. पण घरी आल्यावर रडत बसतो. का? माहीत आहे त्याला हवी असते एक छान छोटी बहीण किंवा एक मस्तपैकी भाऊ. आई-बाबांना तो रोज सांगायचा. पण आईबाबा कसले? नुसतेच हसायचे. म्हणायचे, मागवलाय दिल्लीहून. येईल लवकरच. पण यायचा नाही नि काही नाही.

प्रथमेशचं म्हणणं काय होतं?– भाऊ नाही, बहीण नाही, मग आम्ही खेळायचं कुणाशी? बॅटिंग पण आम्हीच नि फील्डिग पण आम्हीच करायचं का? चेंडूशी एकट्यानं खेळायचं का? चेंडू अडवणार कोण? आणि खाली गेला तर आणणार कोण?

तो असा रागावला की आई म्हणायची, "एवढंच ना? मी येते ना तुझ्याशी खेळायला!"

पण हे म्हणायची तेवढंच. यायची नाही नि काही नाही. हिचं आपलं सारखं काम. ते नसलं तर शेजारच्या समेळकाकू हजर. त्या गेल्या तरी उमाकाकू, ठमाकाकू आहेतच. मध्ये ती मोलकरीण तडमडणार. अगदीच कुणी नाही तर पाहुणे टपकणार. मग आई आपणाला एक छोटा मुलगा आहे हेच विसरून जाणार!

बाबांचा तर कधी पत्ताच नसायचा. सकाळी बाहेर, दुपारी बाहेर, संध्याकाळी पण बाहेर. रात्री जेवल्यावर विचारायचे, "काय प्रथमेश, बॅट-बॉल खेळायचं का?" प्रथमेश रागावून विचारायचा, "आता झोपेत खेळायचं का?"



शेवटी एक दिवस तो आईजवळ हटूनच बसला. "मला आत्ताच्या आता खेळायला कुणी तरी भिडू पाहिजे. आत्ता म्हणजे आत्ता म्हणजे आत्ता! पाहिजे म्हणजे पाहिजे म्हणजे पाहिजे!!"

गंमत अशी की, तो असा हटून बसलेला असतानाच तिकडून आले बाबा आणि त्यांनी एक मस्तपैकी कुत्रा आणून त्याच्या समोर उभा केला. छान, छोटा, ठेंगणा, ठुसका. एवढंसं तोंड, एवढेसे पाय. बाकी अंगाचा पत्ताच नाही.! पाहावं तिकडे आपले केसच केस. मागं शेपटीचा झुबका. हा कुत्रा आहे की मोठ्ठ्या झाडाचं फूल आहे तेच कळत नव्हतं. बाबांनी आपलं लोकरीची टोपी घालावी तसं त्याला डोक्यावर ठेवून दिलं. तेव्हा मात्र प्रथमेशची कळी खुलली.

"बाबा, हा कुणाचा?" त्यानं विचारलं.

"जो त्याच्याशी खेळेल, दोस्ती करील त्याचा."

"सांगा ना. आपला का?"

घरातून आई धावत आली. म्हणाली, "खरंच आणलात की काय?"

"मग आता काय करणार?" बाबा म्हणाले, "तुम्ही त्याला ताई आणत नाही. भाऊ हवाय तो पण आणत नाही. त्याच्याशी खेळायला तुम्हांला वेळ नाही. मग त्यानं खेळायचं तरी कुणाशी?"

प्रथमेशनं बाबांचं हे सगळं बोलणं दिलं सोडून. हा आपलाच आहे हे त्यानं आता बरोब्बर ओळखलं. आनंदानं उडी मारून त्यानं विचारलं, "बाबा, याचं नाव काय?"

बाबांनी थोडं डोकं खाजवलं आणि त्याचं नाव ठेवलं, "टिंबक्टू!"

त्यावर आई म्हणाली, "कुत्रा केवढा नि नाव केवढं? कुत्र्यापेक्षा नावच मोठं! आपण त्याला सुरुवातीला आपलं टिबू म्हणायचं का?"

प्रथमेश म्हणाला, "चालेल. लिंबू-टिंबूच तर आहे तो!" लगेच त्यानं आपल्या हातातला चेंडू दिला सोडून. तो पाहून टिंबूनं बाबांच्या डोक्यावरून दाणकन उडी ठोकली. तीन उड्यांत चेंडू पकडला आणि आणून टाकला प्रथमेशच्या पुढ्यात. प्रथमेशनं पुन्हा तो उडवला. टिंबक्टूनं तो दोनच उड्यांत परत आणून दिला.

प्रथमेश पुन्हा पुन्हा चेंडू फेकत होता आणि टिंबक्टू तो न कंटाळता परत आणून देत होता. बाबा म्हणाले, "बघ, एकदा तरी कंटाळतोय का तो? असा न कंटाळता तुझा भाऊ नि मित्र तरी आणून देईल का तुला चेंडू?"

पण प्रथमेशची आई काळजीत पडली. म्हणाली, "आता अभ्यास कोण करणार?"

पण प्रथमेशचं लक्ष होतं कुठे? आता तो भलताच रंगात आला होता. रंगात आला की त्याचं एक छान छोटं गाणं होतं– "छिकी छांव, छिकी छांव, छिकी छांव, छिकी छांव, मिकी मांव, मिकी मांव, मिकी मांव, मिकी मांव. . . " ते त्यानं सुरू केलं. 'छिकी छांव' म्हणजे काय ते टिंबक्टूला कळेना. ते सुरू झालं की तो आपला प्रथमेशच्या तोंडाकडे बघत राही. पण हळूहळू त्यालाही त्यातली गंमत कळली. 'छिकी छांव'च्या तालावर दोघांची गट्टी सुरू झाली.

पण यामुळं व्हायचं काय? प्रथमेशचा अभ्यास आपला दप्तरातच राही. मग त्याची आई टिंबक्टूवर डाफरायची. म्हणायची, "ए टिंबा, बघतोस काय नाक फेंदारून? दादाचा अभ्यास कोण तू करणारेस का?"

एकदा एकदा टिंबक्टूला ती साखळी लावून गॅलरीत डांबून ठेवी. मग तिकडे तो कूंकूं करून रडत-ओरडत राही. प्रथमेशला ते मुळीच आवडत नसे. तो हळूच त्याला सोडून देई.

एक दिवस प्रथमेशच्या आईनं टिंबक्टूला असंच बांधून ठेवलं आणि

ती गेली बाजारात. परत आल्यावर पाहते तर काय, याचं छिकी छांव छिकी छांव आणि त्याचं आलो थांब, आलो थांब! म्हणजे काय ठाऊक आहे का? प्रथमेश छिकी छांव करून त्याला हुलकावण्या देतोय आणि हा आलो थांब म्हणून जीव तोडून पळतोय!

आईनं प्रथमेशला विचारलं, "याची साखळी कशाला सोडलीस?"

प्रथमेश म्हणाला, "मग काय करू? तू त्याला अडकवून कशाला ठेवतेस? तो राहतो रडत– कूं कूं कूं कूं करून!"

आई म्हणाली, "अरे पण तिकडे तुझा अभ्यास रडत राहतो दप्तरात तो? त्याला का नाही सोडत मग?"

प्रथमेश म्हणाला, "अभ्यास होणारच कसा? इकडे हा ओरडून ओरडून मला छळत राहतो तर?"

तशी आई टिंबक्टूला रागावली. म्हणाली, "आमच्या प्रथमेशला छळत राहतोस काय? थांब, संध्याकाळी तुला आपला पोचवूनच देते."

त्याबरोबर प्रथमेश फुरंगटून बसला. म्हणाला, "आम्ही नाही जा!"

आई म्हणाली, "अरे, आता नाही जा कां? तुला तो छळतो म्हणालास ना?"

"म्हटलं म्हणून काय लगेच घालवून द्यायचं?" प्रथमेशनं विचारलं. "तसं काय? तू पण बाबांना कित्ती वेळा सांगत असतेस–"

"काय?"

"प्रथमेश आपणाला दिवसभर छळत असतो म्हणून. म्हणजे काय बाबांनी मला हाकलून द्यायचं?"

ते पाहून आईला वाटलं वाईट. ती लगेच म्हणाली, "तसं नव्हे रे राजा. मी आपला खोटा खोटा दम दिला. ते खरं नव्हे काही. तूच म्हणालास की नाही, टिंबू मला छळतो म्हणून? म्हणून आपलं गमतीनं ओरडले झालं!"

प्रथमेशनं विचारलं, "गमतीनं असं ओरडतात कुणी?"


"नाही का? म्हणजे आमचं चुकलंच म्हणायचं." आई तोंड चिमणीएवढं करून म्हणाली. मग तिनं काय केलं? प्रथमेशच्या जानी दोस्ताला

कडेवर उचलून घेतलं– लहान बाळासारखं आणि लागली त्याच्याशीच बोलायला. त्याच्या तोंडात तिनं एक बटर टाकला आणि म्हणाली, "आता ब़ोल तुला काय बोलायचं ते!" ते पाहून प्रथमेशला आलं हसू. रुसवा गेला कुठल्या कुठे पळून. तो म्हणाला, "आता कसा तो बोलणार? तू त्याच्या तोंडात बटर टाकल्यावर?"

तेव्हापासून मग प्रथमेशची आईही टिंबक्टूचे लाड करू लागली. त्याचा प्यार तो तिचाही प्यार बनला. एक दिवस ती देवाची पूजा करीत होती. तर तिथं हा आला. दोन पाय वर करून म्हणाला, "मला पण लाव ना गंध!" प्रथमेशच्या आईला त्याची भाषा बरोब्बर कळली. तिनं त्याच्या कपाळावर पिंजरेची चिमूट सोडली. आणि म्हणाली, "चल चल रे मुंज मुला– तुजवरि गुलाल उधळीला!"

एक दिवस तर तिनं मज्जाच केली. टिंबक्टूला एक जाकीट शिवलं. जुन्या जांभळ्या साडीचं. त्याला होती जरीची सोनेरी किनार. त्याचं हे कौतुक पाहायला शेजारपाजारचे शंभर लोक जमले. ते जाकीट मिरवीत तो सगळीकडे हिंडत होता, आणि प्रत्येक जण त्याला उचलून घेत होता. प्रथमेशला यातलं काहीच ठाऊक नव्हतं. तो होता शाळेत. घरी आल्यावर पाहतो, तर टिंबक्टू आपला अंगात नुसतंच अंगडं चढवलेल्या पकुल्या बाळासारखा.

प्रथमेशनं विचारलं, "याला जाकीट कुणी शिवलं आई? तू?"



"हो ना! काय करणार? तो बसला रुसून. म्हणाला, प्रथमेशला तेवढे कपडे. आम्हांला कां नाही? मग काय करणार? दुपारी एक ड्रेस शिवून टाकला. छान दिसतो का तुमच्या जानी दोस्ताला?"

"छान म्हणजे काय, मस्तच दिसतो! आई, मी याला गल्लीतल्या मित्रांना दाखवून आणू का?"

आई म्हणाली, "आण. पण तुझ्या सगळ्या मित्रांना नाही हो कपडे शिवणार मी! नाही तर ते म्हणायचे, आम्हांला कां नाही कपडे? आम्ही पण प्रथमेशचे जानी दोस्त आहोत."

पण आईची ही चेष्टा ऐकायला प्रथमेश तिथे थांबलाच नाही. जाकीटवाल्या टिंबक्टूची साखळी पकडून तो घराबाहेर पडला. एकापुढं एक अशा चार गल्ल्या होत्या आणि प्रत्येक गल्लीत एक तरी मित्र होताच. पण मुख्य रस्ता सोडून तो पहिल्या गल्लीत वळतो, तर त्या गल्लीतून एकदम तीन-चार कुत्रे भुंकत सुटले. टिंबक्टूनं ते पाहिलं तसा तोही लागला भुंकायला. अजिबात घाबरला नाही.

पण प्रथमेश घाबरला. एकदम चार कुत्रे येताहेत हे पाहिल्यावर तो लागला टिंबक्टूला मागे ओढायला. पण टिंबक्टू कुठला थांबतो? तो लागला त्यांच्याच अंगावर जायला. प्रथमेशला तो जाम आवरेना. ते चार राक्षस आणि टिंबक्टू तर लोकरीच्या कानटोपीएवढा. आता करायचं काय?

ते जवळ येत होते– अगदी जवळ. आता आपला टिंबक्टू त्यांच्या जबड्यातून सुटत नाही, हे पाहिल्यावर प्रथमेशचा धीर सुटला. त्यानं "देवा" म्हणून डोळे गच्च मिटून घेतले. पण त्याच वेळी टिंबक्टूनं त्याच्या साखळीला एवढा मोठा हिसका दिला की साखळीच सुटली.

पुढं काय झालं ते प्रथमेशला कळलंच नाही. कारण त्या हिसक्यानं तो सपशेल आडवा झाला होता. रस्त्यातल्या दोन माणसांनी धावत येऊन त्याला उठवलं. पण प्रथमेश उठून पाहतो तर काय, कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज तेवढा येत होता. पण कुत्रा एकही दिसत नव्हता. त्याच्या लाडक्या टिंबक्टूचा तर आवाजही ऐकू येत नव्हता. काय झालं

असेल आपल्या टिंबक्टूचं?

रस्त्यातल्या त्या माणसांनी त्याला विचारलं, "काय झालं बाळ?" तेव्हा त्यानं झालेली सारी हकीकत सांगितली. पण त्यातल्या एकाही माणसाला ते कुत्रे कुठे गेले ते माहीत नव्हतं. आता ते भुंकण्याचे आवाजही बंद झाले होते. म्हणजे त्या चार राक्षसांनी आपल्या टिंबक्टूला. . . की काय?

बाप रे! पुढची कल्पनाच त्याला करवेना. तो वेड्यासारखा धावत सुटला. सगळ्या गल्ल्या त्यानं धुंडून पाहिल्या. पण टिंबक्टू नाही आणि ते चार राक्षसही नाहीत! सगळे रस्ते शांत. जणु काही झालंच नाही असे शांत. आता करायचं काय? आपल्या टिंबक्टूला शोधायचं तरी कुठे?

प्रथमेश शेवटी रडत घरी आला. आईला त्यानं सारी हकीकत सांगितली. ती ऐकून तिच्याही डोळ्यांत पाणी आलं. ते पुसून ती घराबाहेर आली. काय झालं, काय झालं म्हणून शेजारपाजारची माणसं जमा झाली. प्रथमेशच्या बाबांना आईनं फोन केला, तेव्हा तेही ऑफिसातून घरी आले. सर्वांनी मिळून आजुबाजूच्या गल्ल्या पुन्हा धुंडून पाहिल्या. घरीदारी चौकशी केली. पण टिंबक्टूचा कुठेही पत्ता लागला नाही.

अखेर निराश होऊन सर्व जणं घरी परतली. आणि अचानक टिंबक्टूच्या हाका ऐकू आल्या– "भुक भुक्! भुक् भुक्!. . ."

पाहतात तर काय? हा वर गच्चीतल्या टाकीवर जाऊन उभा! प्रथमेशच्या बाबांनी धावत वर जाऊन त्याला उचलून खाली आणलं. गळ्यात साखळी तशीच! खाली आल्याबरोबर त्यानं उडी घेतली आणि प्रथमेशच्या अंगाशी लागला नाचायला. प्रथमेशला एवढा आनंद झाला– त्यानं त्याला मिठी मारली.

"पण हा वर गेला कसा? गच्चीत?" प्रथमेशच्या आईनं विचारलं.

प्रथमेशचे बाबा म्हणाले, "कसा म्हणजे? दार बंद. मग काय करणार तो? तो काय बेल वाजवत बसणार? दिसला जिना, गेला वर. नाही तर त्याला गच्चीत कोण नेणार होतं?"

प्रथमेशला प्रश्न पडला होता, "पण आधी हा आलाच कसा घरी?"

"त्याला काय झालं? त्याला आता रस्ते पाठ झाले आहेत." बाबा म्हणाले, "रोज सकाळ-संध्याकाळ आपण फिरवून नाही का आणत त्याला?"

"तसं नव्हे हो." प्रथमेशचा प्रश्न वेगळाच होता. "मी म्हणतो, तो आधी त्या चार राक्षसांच्या तावडीतून सुटला कसा?"

याचं उत्तर मात्र कुणालाच माहीत नव्हतं. ते माहीत होतं फक्त टिंबक्टूला. पण तो सांगणार कसा? मी त्या राक्षसांच्या हातावर तुरी देऊन पळालो म्हणून? त्याला कुठे बोलता येत होतं? त्याला जर बोलता आलं असतं ना, तर त्यानं असंही सांगितलं असतं, "आमच्यात नेहमीच अशी फायटिंग करावी लागते. तुमच्यासारखं रडत नाही बसत आम्ही! कळलं का, प्रथमेशराव?"

***

# वाघबच्चा फाकडा!

गावाबाहेरच्या टेकडीशी होतं एक पडकं घर. म्हणजे फार पूर्वीच्या काळी तिथे माणसं राहायची. पण मग गावात त्यांनी दुसरं मोठ्ठं घर बांधलं. आणि हे टेकडीच्या पायथ्याचं घर दिलं सोडून.

त्यामुळं झालं काय? उंदरांची झाली मज्जा. त्यांनी ते आपलं घर करून टाकलं. म्हणजे कळलं का? उंदरांनी तिथं केली आपली बिळं, आणि लागले आरामात तिथे राहायला. उन्हाचा ताप नाही, पावसाची भीती नाही. माणसांच्या घराचे उंदीर बनले मालक!

पण एक दिवस काय झालं? तिथे आला एक भला दांडगा बोका. एवढा दांडगा की हा बोका आहे की वाघाचा बेटा आहे कळेना. एकदोन उंदीर असले फसले. त्यांना वाटलं, रानातलं वाघाचं पिल्लूच फिरत फिरत इकडे आलंय. म्हणून ते गेले पाहायला. तर लगेच यानं झडप घातली. तेव्हा सर्व उंदरांना कळून चुकलं, हा आपला कर्दनकाळ आहे!

बोक्याची मात्र चंगळ झाली. घरात माणूसच नाही म्हटल्यावर बोक्यानं ते आपलंच राज्य करून टाकलं. कुठेही बसा, कुठेही लोळा, कुठेही झोपा. कुणी फटका मारून उठवणार नाही की हाकलणार नाही. माणसांची कटकट नाही आणि उंदरांना तोटा नाही. मनात आलं की नुसती उडी घ्यायची. खाली उंदीर, वरती उंदीर, आत उंदीर, बाहेर उंदीर. शिवाय आजुबाजूला छोटे छोटे पक्षीही होते. त्यामुळं त्याची खाण्यापिण्याची चंगळ उडाली होती.

त्यामुळं झालं काय? बोक्यानंही तेच आपलं घर केलं. आता आली का पंचाईत? उंदरांच्या घरात बोका बनला राजा! उंदरांचे झाले वांधे. बिळाबाहेर यायचं म्हणजे बोक्याच्या तोंडातच पडायचं. केव्हाही पाहावं

तर बोका आपला इकडून तिकडे इकडे फिरतोय– कर्दनकाळासारखा!

शेवटी उंदरांच्या म्होरक्यानं ठरवलं, यापुढं इथं राहून चालणार नाही. हे घर सोडून दुसरं घर शोधलं पाहिजे. नाही तर हा बोका आपला सर्वांचा फन्ना उडवील. म्हणूनच त्यानं सर्व उंदरांना इशारा दिला–

"आज रात्री चंद्र मावळल्यावर, दाट काळोख पडल्यावर आपण इथून बाहेर पडायचं. ज्याला जी मिळेल ती वाट पकडायची. मात्र सर्वांनी वडाच्या झाडाशी एकत्र जमायचं, आणि तिथून एका गुप्त वाटेनं पुढं जायचं."

पण काळोखात उंदरांना दिसतं तसं मांजरालाही दिसतं. रात्री बोक्यानं पाहिलं, तर सगळे उंदीर आपले बाहेर पडलेयत. एकदा त्याला वाटलं, घ्यावी उडी आणि करावे दोनचार गट्टम! पण केवढी मोठी उडी घेतली तरी एका वेळी एकच उंदीर मिळणार. एकाला धरल्यावर बाकीचे उंदीर जाणार पळून. सगळे पळून गेल्यावर खायचं काय? त्याला रोज पुरवून पुरवून उंदीर खायचे होते. माणसांच्या वस्तीत ते मिळवायला फार कष्ट पडतात. म्हणून तर तो एवढ्या लांब रानात येऊन राहिला होता.

मग त्यानं काय केलं? आपला आवाज बदलला. वाघासारखा आवाज काढून तो उंदरांना म्हणाला, "अरे, पळताय कशाला एवढे?"

उंदरांचा म्होरक्या म्हणाला, "तुला काय करायचंय?"

"छे छे! मला काय करायचंय? मला काही करायचं नाही. म्हणून तर म्हणतो, तुम्ही एवढे पळताय कशाला? राहा की इथंच आरामात!" बोका साळसूदपणे म्हणाला.

"आणि काय? आरामात तुझ्या तोंडात जाऊ?" म्हाताऱ्या उंदरिणीनं विचारलं. ती त्या सर्व उंदरांत मोठी होती. तिनं रानावनातले खूप प्राणी पाहिले होते. म्हणूनच तिनं तो वाघ नसून बोका आहे हे बरोब्बर ओळखलं होतं.

बोका म्हणाला, "कमाल करताय आजीबाई! तुम्हांला काय वाटलं? मी मांजर आहे म्हणून?"

म्हातारी उंदरीण म्हणाली, "तू नुसतं मांजर नाहीस. तू त्यांच्यातला

बिलंदर आणि क्रूर बोका आहेस. कळलं?''

म्हातारीच्या बोलण्यानं उंदरांच्या म्होरक्याला जास्तच जोर आला. त्यानं त्या बोक्याला विचारलं, ''मांजर नाहीस तर तू काय ससा आहेस का?''

''छे छे! ससा काय? भित्री भागुबाई ती!'' बोका म्हणाला. ''मी आहे वाघ. वाघबच्चा फाकडा म्हणतात ना, तोच मी! तुम्हांला आधी वाघ ठाऊक आहे का?''

उंदरांचा म्होरक्या म्हणाला, ''हे बघ, आम्हांला वाघ ठाऊक आहे, सिंह ठाऊक आहे आणि बिलंदर बोका पण ठाऊक आहे. तू बोका आहेस.''

तरीही बोका मख्खपणे म्हणाला, ''हीच तर खूप जणांची फसगत होते. त्यांना मांजर आणि वाघ यातला फरक कळत नाही. तू वाघ पाहिलायस. पण वाघाचं पिल्लू कुठे पाहिलंयस. वाघाचं पिल्लू जीत मांजरासारखं दिसतं. ठाउकाय? म्हणून म्हणतो, मी ते वाघाचं पिल्लू आहे– वाघबच्चा फाकडा!''

उंदराचं एक पिल्लू धीटपणानं म्हणालं, ''पण कशावरून ?''

बोका म्हणाला, ''मी जर बोका असतो तर तुम्हांला इतका वेळ माझ्याशी बोलता तरी आलं असतं का? एव्हाना तुमच्यातल्या किती जणांना खाऊन बसलो असतो मी. पण मी आहे वाघाचा बच्चा! आम्ही वाघ लोक उंदीरबिंदीर असलं फाल्तू खाणं खात नाही. म्हणून म्हणतो, मला भिण्याचं तुम्हांला काहीच कारण नाही. आरामात राहा इथे.'' आणि बोका वर म्हणतो कसा? ''तुम्हांला कुणी मांजरबिजर खायला आलं तर मला सांगा. मी त्याचा निकालच लावून टाकतो!''

पण बोक्याची ही ढोंगबाजी उंदरांच्या म्होरक्यानं केव्हाच ओळखली होती. काल रात्रीपासून त्यांच्यातले दोन उंदीर गायब झाले होते. या बोक्यानंच ते उठवले असले पाहिजेत. पण उंदरांचा म्होरक्या जास्त काही बोलला नाही. मनात म्हणाला, या बोक्याची गंमतच करूया. चांगली खोड मोडूया.



मग त्यानं काय केलं? आपल्या सर्व उंदीर मंडळीला त्यानं ताकीद दिली, "मी परत येईपर्यंत कुणीही बिळाबाहेर पडू नका." असं बजावून तो एक बिळात शिरला आणि बिळाबिळांतून पळत पळत तिथून बाहेर सटकला.

टेकडीच्या पलीकडे एक मोठ्ठं अरण्य होतं. त्यात होतं एक वाघांचं कुटुंब. खूप लांबवर पळत गेल्यावर उंदरांचा म्होरक्या तिथे येऊन पोचला. पण तिथं होती फक्त एक वाघीण. पाय ताणून लोळत पडली होती. तिनं आपला एक पाय डोळ्यांशी नेऊन ठेवला होता. त्यामुळं उंदराला आधी वाटलं, हिला एकच डोळा आहे की काय? पण उंदराला पाहताच वाघिणीनं डोळ्यावरचा तो पाय काढून घेतला. दोन्ही डोळ्यांनी उंदराला नीट पाहून घेतलं. मग विचारलं, "काय रे? कोण पाहिजे तुला?"

उंदीर म्हणाला ,"मला कोणी नकोय. तुमचं एक पिल्लू हरवलंय का?"

वाघीण म्हणाली, "नाही."

उंदरानं विचारलं, "मग आहेत कुठे ती पिल्लं?"

वाघीण म्हणाली , "ती गेलीयत आपल्या वडिलांबरोबर शिकारीला."

उंदीर म्हणाला, "मग बरोबर. त्यातलंच एक पिल्लू आमच्याकडे आलंय."

"कशावरून ?"

उंदीर म्हणाला, "तेच सांगतंय. म्हणतं, मी वाघाचा बेटा आहे आणि वाट चुकलोय."

"खरं की काय?" म्हणत वाघीण एकदम उठून बसली. म्हणाली, "मग बरोबर घेऊनच नाही का यायचं त्याला?"

उंदीर म्हणाला, "ते यायला तयार नाही ना? आम्ही पहिल्यांदाच सांगितलं त्याला."

"काय?"

"की तू वाघ आहेस, मग इकडे कशाला आलास? तर म्हणतो, मला उंदीर आवडतात. म्हणून आलो मी इकडे!"

वाघीण म्हणाली, "वेडा आहे तो! आमच्यात उंदीर कुणी खातं तरी का?"

"तेच म्हटलं आम्ही त्याला. उंदीर खाल्लेस तर आई धरून मारील तुला! पण ऐकायलाच तयार नाही. म्हटलं, थांब, तुझ्या आईलाच बोलावून आणतो." उंदीर काय हव्या त्या थापा मारीत होता. वाघिणीला ते आपलं सगळं खरंच वाटत होतं.

ती म्हणाली, "एकदा एकदा असंच करतो. अगदी वेड्यासारखा हटून बसतो. अरे, एक दिवस हत्तीसाठीच हटून बसला. आता हत्ती केवढा? आपण केवढे? पण पोरांना काय कळतंय?"

उंदराचा जीव असा असा होत होता. तिकडे तो बोका आपले काही उंदीर खाऊन टाकील म्हणून. म्हणूनच वाघिणीला तो म्हणाला, "आता चला लवकर. नाही तर तुमचं ते पिल्लू आणखी कुठे तरी जाईल."

उंदराला वाघीण आपल्याबरोबर तिकडे यायला हवी होती. ते मांजर आहे हे कळलं तर ती कशाला येईल तिकडे? आणि ती नाही आली तर बोक्याचं बेंड फुटणार कसं? त्याचं वाघाचं सोंग बाहेर येणार कसं? म्हणूनच वाघिणीला तो म्हणत होता, "आता चला लवकर." एवढं

म्हणून तो चालायला लागला. तशी वाघीण पण निघाली त्याच्या मागून. मग मात्र तिला झाली घाई. दाणदाण उड्या मारीत ती पळत सुटली. तिच्याबरोबर पळता पळता उंदराची उडाली तारांबळ. तशी वाघीण म्हणाली, "तू माझ्या पाठीवर बसतो का?"

उंदीर म्हणाला, "नको नको. तुझ्या एका उडीत मी जाईन पडून वाटेत. त्यापेक्षा तू थोडं सावकाश चल ना!"

वाघीण म्हणाली, "बरं."

शेवटी वाघिणीला घेऊन उंदीर टेकडी चढून वर आला. तिथून वाघिणीनं लांबवर पाहिलं, तर समोरच्या झाडीत तिला एक घर दिसलं.

उंदराला तिनं विचारलं, "हेच का ते घर?"

उंदीर म्हणाला , "हो."

वाघिणीनं विचारलं, "पण हे तर माणसाचं घर आहे."

उंदीर म्हणाला, "नाही नाही, माणूस बिणूस कुण्णी नाही. आमचंच आहे ते. तुम्ही बिनधास्त चला."

पण वाघीण त्या घराशी येऊन पाहते तर काय? तिचं पिल्लू कुठेच दिसत नव्हतं. ती एकदम गुरगुरली. म्हणाली, "आहे कुठे माझं पिल्लू? इथे तर कुणीच दिसत नाही!"

दिसणारच कसं? वाघिणीचं पिल्लू होतं कुठे तिथे? तिथे होता तो बोका. वाघिणीला पाहिल्यावर तो कशाला थांबतो तिथे? तो बसला होता जाऊन घरामागच्या झाडावर. पानांच्या दाट झाडीत दडून. पण तो दडला तरी त्याच्या अंगाचा वास कुठे दडणार? थोड्याच वेळात तो वास भरला वाघिणीच्या नाकात. त्याबरोबर तिचं नाक फेंदारलं. डोळे एवढे मोठ्ठे झाले. तोंडाला पाणी सुटलं. नजर चौफेर फिरली, तर पानांच्या दाटीत हा गुपचुप बसलेला!

ते पाहून उंदरांच्या म्होरक्याचंही लक्ष तिकडे गेलं. तो म्हणाला, "पाहिलात? तुम्हांला पाहिल्याबरोबर कसा झाडावर दडून बसलाय तो?– वाघबच्चा फाकडा!"

वाघीण म्हणाली, "शीः! हा वाघबच्चा? हा आहे मांजरबच्चा खोकडा!

तरी मला वाटलंच. आमचं पिल्लू वाट चुकेलच कसं? त्याचे बाबा त्याच्याबरोबर असताना?''

उंदीर साळसूदपणे म्हणाला, ''आता आम्हांला काय माहीत? त्यानंच तर सांगितलं. म्हणाला, मी आहे वाघबच्चा फाकडा! वाट चुकलो- दाखवा!''

''असं होय?'' वाघीण डोळे आणखीन मोठ्ठे करून म्हणाली, ''मग त्याला वाट दाखवलीच पाहिजे!'' असं म्हणून वाघिणीनं उडी घेतली आणि ते झाड पकडलं. वाघीण आता झाडावर चढणार हे पाहताच बोका जो काय घाबरलाय! त्यानं समोरच्या फांदीवर उडी घेतली आणि उड्यांवर उड्या घेत तो पार कुठल्या कुठे धावत सुटला. वाघीण त्याच्या मागावरच होती. तो पुढं आणि वाघीण मागं. बघता बघता दोघंही रानात दिसेनाशी झाली.



उंदराच्या म्होरक्याला दुसरं काय हवं होतं? त्याची युक्ती बरोबर लागू पडली होती. बोका आता वाघिणीच्या तावडीत सापडला होता. आता ती काय त्याला सोडणार? आणि अगदी तिच्या तावडीतून तो सुटला तरी काय? या रानात वाघ आहेत हे एकदा कळलं की बोका परत तिकडे येतोयच कशाला मरायला?



उंदरांच्या म्होरक्यानं मग शिट्ट्या मारून आपल्या सगळ्या उंदरांना जवळ बोलावलं. म्हणाला, ''चला, वाघबच्चा संपला. दोघांनाही लावलं पळवून. एका दगडात दोन पक्षी! आता राज्य आपलंच आहे!''

❋ ❋ ❋

३१।२।२००२
३०६०६
वी. वी.

# काव काव नाही– कुहू कुहू!

आंब्याच्या झाडावर बसून कावळा आपल्या पिल्लांना बोलायला शिकवीत होता, "काव काव–काव काव!"

तीन पिल्लं बरोबर बोलत होती, "काव काव–काव काव!"

पण चौथं पिल्लू म्हणत होतं, 'कुहू कुहू–कुहू कुहू!"

कावळा वैतागला. म्हणाला, "हे एक पिल्लू त्या कोकिळेचं आहे की काय?"

"कशावरून?" कावळिणीनं विचारलं.

"त्याचे शब्द बघ ना. कुहू कुहू काय? आणि याची चोच पाहिलीस? किती एवढीशी आहे बघ ना? आणि याचा रंगसुद्धा कसा वेगळाच आहे."

कावळीण म्हणाली, "असेना का? छान आहे. मला असं एक बाळ हवंच होतं. गोड, नाजुक, सुबक!"

कावळ्यानं विचारलं, "पण इतके दिवस तुला कळलं कसं नाही?"

"काय?"

"हे एक पिल्लू वेगळं आहे ते?"

"तुम्हांला तरी कुठे कळलं?" कावळिणीनं विचारलं.

"मला कसं कळणार?" कावळ्यानं विचारलं. "अंडी घालणार तू की मी? आपण किती अंडी घातली हे तू सांगशील तेव्हा ना कळणार आम्हांला?"

"ते जाऊ द्या आता. झालं ते झालं." कावळीण म्हणाली. "पिल्लू छान आहे की नाही?"



"पिल्लू मस्त आहे. पण हे कळलं तर भांडायला येईल ना ती? आपलं पिल्लू पळवलं म्हणून?" कावळा म्हणाला, "हल्ली भारीच करायला लागल्येय ती. उंचातल्या उंच झाडाचा पाळणा करून महाराणीसारखी डुलत असते!. असशील तू श्रीमंत पतीची राणी. म्हणून काय तुझ्या पोटचं पोर लोकांनी वाढवायचं?"

"असेना का? आपणाला एक मस्त पिल्लू मिळालं की नाही?"

"मिळालं कसलं?" कावळ्यानं विचारलं, "हरामखोर आहे ती बया. आपलं अंडं आमच्यात ढकलायचं आणि आपण दिवसरात्र मज्जा करायची– वरच्या मजल्यावर बसून. असं वाटतं की, तिचं हे पोरटं घ्यावं नि द्यावं भिरकावून खाली."

"काही उपयोग नाही त्याचा." कावळीण म्हणाली. "त्याला आता उडायला पण यायला लागलंय थोडं थोडं. तुम्ही कुठेही फेकलं तरी मिळेल ती फांदी पकडून बसणार ते. म्हणजे त्या बयेचं बरंच झालं. आयतंच तिला आपलं पिल्लू परत मिळणार!"

तेवढ्यात लांबून कुठून तरी कोकिळाचा आवाज आला, "कुहू-कुहू, कुहू-कुहू!"

तो ऐकताच ते वेगळं पिल्लू लागलं वळवळायला. त्याच्याही तोंडून नाजुक आवाज आला, "कुहू कुहू–कुहू कुहू!"

"पाहिलंत?" कावळीण नवऱ्याला म्हणाली, "याला कंठ पण फुटला. आता ती बया याला रोज अशा हाका मारीत बसणार, आणि–" कावळीण तिथंच थांबली. तिला वाईट वाटत होतं.

"आणि काय? थांबलीस का?" कावळ्यानं विचारलं.

"आणि काय? मला वाटत होतं, आपल्या पोटी हे एक छान पिल्लू देवानं दिलंय. नाजुक, सुंदर आणि गोड आवाजाचं. अगदी कोकिळेसारखं. नेहमी ही कोकिळा मिजास मारीत असते. आपल्या रूपाची, आपल्या आवाजाची घमेंड दाखवीत असते. तर तिला दाखवता येईल–"

"काय?" कावळ्यानं विचारलं.

"बघ, आमच्यात सुद्धा अशी पाखरं असतात."

"म्हणजे तुला हे पोर वेगळं आहे हे ठाऊक होतं?"

कावळीण त्या वेगळ्या पिल्लाकडे एकटक पाहत म्हणाली, "ते अंड्याबाहेर आलं त्याच वेळी मी ओळखलं–"

"काय?"

"की हे वेगळं आहे. छान आहे, गोड आहे. याचा रंग पण कसा मस्त आहे. म्हटलं, देवानं आपल्या पोटी एक सुंदर बाळ दिलंय. मला आकाश ठेंगणं वाटू लागलं. म्हणून मी एक उंच भरारी मारली. लांब लांब गेले. आणि गावाबाहेर तो निळा बंगला आहे ना, तिथून सफरचंदाचा कीस आणला, म्हटलं मस्तपैकी खाऊ देऊ याला. पण परत येऊन पाहिलं तर काय?"

"काय?" कावळ्यानं विचारलं.

"तिकडून ती बया हाका मारतेय आणि इकडून याचा जीव तिच्याकडे जाण्यासाठी सारखा तुटतोय. हे निघालंसुद्धा होतं तिच्याकडे. पण इकडून मी दटावलं, चूप म्हणून. तेव्हा तिकडून ती –त्याची आई की कोण ती–ती पण म्हणाली–"

"काय म्हणाली?"

"म्हणाली, घाई करू नको. पडायला होईल. अजून थोडं थांब हो बाळा. मग आम्ही येऊ नि तुला घेऊन जाऊ."

"अस्सं काय?" म्हणून कावळ्यानं त्या उंच झाडाकडे पाहिलं आणि तो म्हणाला, "म्हणजे स्वतःचं अंडं तिनंच आपल्या घरट्यात आणून टाकलंय हे नक्की. ते तुझ्या पोटी आलेलं नाही. थांब, असाच जाऊन तिची मान पकडतो–"

"नको नको." कावळीण म्हणाली, "आधी नको. ती पक्की लबाड आहे. म्हणेल, कशावरून तुम्ही असं म्हणता? उलट तुम्हीच माझं अंडं पळवलंत असं पण म्हणायला कमी करणार नाही ती बया. मोठी बिलंदर आहे. ती खाली आली आणि आपल्या पिल्लाला तिनं तोंड लावलं की मग ती बरोबर आपल्या कचाट्यात सापडेल."

"म्हणजे हे पिल्लू आपलंच आहे असं म्हणतेयस तू?" कावळ्यानं विचारलं.

"मग? म्हणायलाच पाहिजे. आपला रिवाज काय आहे?"

"कसला रिवाज?"

"आपल्या पिल्लाला जर कुणी हात लावला किंवा तोंड लावलं तर आपण काय करतो?"

"आपण त्याची पाठ सोडत नाही. त्याच्यावर हल्ला करतो. एवढा मोठा माणूस–त्याला आपण सोडत नाही–त्याचा हात चुकून आपल्या अंड्याला लागला तरी! मग ही तर काय, किस झाडकी पत्ती!"

कावळा आणि कावळीण यांचं हे बोलणं झाडाच्या उंच शेंड्यात गुपचुप बसून कोकिळा ऐकत होती. कावळ्यानं ते पाहिलं तसा त्याला आणखीनच राग आला.–"चोरून आमचं बोलणं ऐकतेस काय?" असं म्हणून त्यानं एक उंच सुळकांडी मारली आणि तडक जाऊन कोकिळेला गाठलं. बाजूला तिचा नवरा कोकिळ– तो पण बसला होता. कावळा वर येतोय हे पाहताच ती दोघं उठली आणि पळत सुटली. कावळ्यानं त्यांचा पाठलाग चालू केला. पण त्यांच्या चपळ गतीपुढं कावळ्याचा टिकाव लागत नव्हता. तो फार मागं पडला तेव्हा त्यानं त्यांना दम दिला, "याद राखा. जर का आमच्यातल्या एकाही पिल्लाला हात लावलात तर पंख पिरगाळून टाकीन. कळलं?"

पण हे ऐकायला कोकिळा आणि कोकिळ तिथे थांबलीच कुठे होती? ती केव्हाच पसार झाली होती.

–दोन दिवस झाले, कावळा-कावळीण पिल्लं सोडून लांब कुठे जातच नव्हती. घरट्याजवळच दोघं फिरत राहायची. कोणी कुठे दिसलं

की धावत घरट्यावर परत यायची.

त्यांचा हा कडक पहारा पाहून कोकिळा आणि कोकिळ दोघेही काळजीत पडली. आपल्या पिल्लाला बाहेर काढायचं कसं? शेवटी कोकिळ कोकिळेला म्हणाला, "आपण काही दिवस कुठे तरी दूर लपून राहू. म्हणजे त्यांना वाटेल, कोकिळ मंडळी झाड सोडून गेली."

त्यावर कोकिळा म्हणाली, "आपण कुठेही जाऊन राहिलो तरी तुझं कोकलणं कुठे जाणार आहे? तुझं कुहू-कुहू सुरू झालं की सगळ्या गावाला डंका! आणि लोक ऐकायला लागले, काय मधुर आवाज़ आहे म्हणायला लागले, की तुला येतो ऊत! कुहू-कुहू, कुहू-कुहू करून बेंबीच्या देठापासून ओरडत सुटतोस आवाज फाटेपर्यंत. ते ऐकल्यावर कावळीण आणि कावळा लगेच सावध होणार."


"पण आजपासून मी तोंडाला कुलूपच लावून बसतो ना! अगदी इळी मिळी गूप चिळी!" एवढं बोलून त्यानं आपल्या तोंडाचा चंबू करून दाखवला.

कोकिळा म्हणाली, "इळीमिळी करायचं तर मग लांब तरी कशाला जायचं? समोरच्या गल्लीत अशोकाचं झाड आहे ना? त्याच्या शेंड्यावर दाट पानांत जाऊन राहिलो तरी कुणाला काही कळणार नाही. अशोकाच्या झाडाला फांद्या नाहीत ना? नुसत्याच किरट्या काड्या. त्यामुळे कावळे मंडळींना ते आवडत नाही."

ही कल्पना कोकिळेच्या नवऱ्याला इतकी आवडली की भुर्रकन उडून तो अशोकाच्या शेंड्यात जाऊन बसला पण. मग कोकिळाही तिथे जाऊन बसली. अशोकाचं झाड आपलं अस्वलासारखं झुलत होतं. तिथं कुणी येत नव्हतं की जात नव्हतं.

लागोपाठ तीन दिवस गेले. कोकिळा आणि तिचा नवरा दोघांचाही कुठे पत्ता नव्हता. कावळ्याच्या घरट्यातलं कोकिळेचं पिल्लू आई-बाबांना सारखं हाका मारीत होतं. "कुहू-कुहू, कुहू-कुहू–" पण कुठूनही त्याच्या आई-बाबांची ओ येत नव्हती.

ते पाहून कावळीण खूष झाली. तिला वाटलं, अशीच घाबरून ती



दोघं परत आली नाहीत तर ते पिल्लू आपलं होईल. आपल्याकडेच राहील. मग सर्वांना वाटेल, हे इतकं सुंदर पिल्लू आपलंच आहे.

पण दुसऱ्याच दिवशी पहाटेची गोष्ट. भल्या पहाटे कोकिळाचा आवाज त्या रानात घुमला. कुहू-कुहू, कुहू-कुहू! सर्व पक्षी गाढ झोपेत होते. तशी पहाटे उठून कोकलण्याची कोकिळांना सवयच असते. त्यामुळं त्यांचा आवाज कावळा- कावळिणीलाही कळला नाही. पण कावळिणीच्या पिल्लांत कोकिळेचं पिल्लू होतं त्याला त्या आवाजानं लगेच जाग आली. त्याला कळलं, हा आवाज आपल्या बाबांचा आहे. ते आपणालाच हाका मारीत आहेत. ते अलगद उठलं आणि घरट्याबाहेरच्या फांदीवर येऊन बसलं. त्याच्या आई-बाबांनी ते पाहिलं, त्याबरोबर ती दोघं धावत तिथे आली. कोकिळेनं पिल्लाला खुणा करून सांगितलं, ''हळूहळू उडत आमच्या मागनं ये. बोलायचं नाही की चालायचं नाही. नुसतं उडत यायचं– हळूहळू– आमच्या मागनं.''

पिल्लू हुषार होतं. त्याला त्याच्या आईची भाषा बरोब्बर कळली. हळूहळू उडत ते आई-बाबांच्या मागून वरच्या फांदीवर आलं. त्यालाच लागून आंब्याची दोन झाडं होती. तीही त्यानं पार केली आणि ते आई-बाबांच्या साथीनं अशोकाच्या झाडावर आलं. दाट काळोखात ते एक-दोनदा धडपडलं, पण रडलं नाही की ओरडलं नाही.

आपल्या घरी आल्यावर काय, त्याची मज्जाच मज्जा झाली. आई-

बाबांच्या संगतीत उडायचं, उनाडायचं, सूर मारायचे, तिरक्या सुळकांड्या मारून वरवरच्या फांद्यांवर जाऊन बसायचं आणि मस्त मस्त फळं खायची.

सकाळी उजाडल्यावर कावळा नि कावळीण पाहतात तर काय, ते वेगळं पिल्लू आहे कुठे? त्यांनी आजुबाजूच्या झाडाझुडपांत खूप शोधून पाहिलं, पण पिल्लाचा पत्ता नव्हता.

तेवढ्यात पलीकडच्या दाट झाडीतून कोकिळाचा आवाज आला, "कुहू-कुहू, कुहू-कुहू, कुहू-कुहू!"

त्यामागून त्याच्या पिल्लाचाही नाजुक आवाज आला, "कुहू-कुहू, कुहू-कुहू!"

तो आवाज ऐकल्यावर कावळा-कावळिणीच्या ताबडतोब लक्षात आलं की हा आवाज त्या पिल्लाचाच आहे. त्यांना कळून चुकलं की पहाटे आपण गाढ झोपेत असताना त्याच्या आई-बाबांनी त्याला हळूच पळवून नेलं असणार. त्याबरोबर ती दोघंही उठली आणि त्या आवाजाचा वेध घेत निघाली. कोकिळांचं ते झाड त्यांनी बरोबर शोधून काढलं.

या दोघांना पाहताच कोकिळा आणि कोकिळ दोघंही घाबरून गेली. कावळा-कावळिणीचा एकच प्रश्न, "आमचं पिल्लू तुम्ही का पळवलं?"

कोकिळा म्हणाली, "पळवलं कुठे? ते पिल्लू आमचंच आहे."

कावळ्यानं विचारलं, "आता तुमचं आहे काय?"

कोकिळा म्हणाली, "हो ना! तुम्हांला ते तुमचं वाटलं का? अहो, काय झालं माहीत् आहे का? चुकून आमचं अंडं तुमच्या घरट्यात पडलं."

कोकिळा पण म्हणाली, "आम्ही काही मुद्दाम नाही आणून ठेवलं ते तुमच्या घरात."

कावळ्यानं विचारलं, "कशावरून?"

तेव्हा कोकिळा म्हणाली, "नाही तर आमचं एवढं सोन्यासारखं पिल्लू आम्ही तुमच्यात कशाला टाकू?"

कावळा चिडून म्हणाला, "तुमचं सोन्यासारखं? आणि आमची

काय लोखंडाची? ते काही नाही. तुम्ही आमची फसवणूक केली. लबाडीनं तुम्ही आपलं अंडं आमच्यात ढकलून दिलं. आणि आम्ही एवढं चांगलं वाढवल्यावर पळवून नेलं. याबद्दल आम्ही तुम्हांला अद्दल घडवल्याशिवाय राहणार नाही.''

कावळा आणि कावळीण दोघंही कोकिळांचं काही ऐकूनच घ्यायला तयार नव्हती. कोकिळ आणि कोकिळा दोघांनी कावळ्यांची माफी मागितली. ''आपल्या हातून अशी चूक पुन्हा घडणार नाही–'' असंही कबूल केलं. पण कावळा-कावळीण ऐकायलाच तयार नव्हती.

शेवटी कोकिळा म्हणाली, ''तुम्ही सांगाल ती शिक्षा भोगायला आम्ही तयार आहो. मग तर झालं?''

तेव्हा कावळ्यानं त्यांना शिक्षा फर्मावली, ''आजपासून तुम्ही आमच्या वस्तीत राहायचं नाही. फिरकायचं पण नाही. आम्ही जातो त्या माणसांच्या वस्तीतही यायचं नाही. आमच्या वस्तीत जर कुठे तुम्ही दिसलात तर आम्ही तुम्हांला सोडणार नाही. कबूल?''

''कबूल.''

कोकिळा आणि कोकिळ यांनी ते कबूल केलं आणि कावळ्यांच्या तडाख्यातून आपली सुटका करून घेतली.

तेव्हापासून कोकिळा दाट पानांच्या उंच झाडांतून राहतात. खाली जमिनीवर उतरत नाहीत. कुणाला दिसत नाहीत. त्यांचं कुहू-कुहू तेवढं ऐकू येतं, पण त्या दिसत नाहीत. चुकून एखाद्या उघड्यावाघड्या झाडावर कोकिळा बसलेली दिसली तर कावळा तिला तिथून पळवून लावतो. म्हणूनच त्या दाट पानांच्या झाडांवर कायम लपून असतात. माणसांच्या वस्तीत तर त्या कधीच उतरत नाहीत. पण आपली अंडी कावळ्यांच्या घरट्यात ठेवायचं सोडीत नाहीत! आहेत की नाहीत पक्क्या वस्ताद?

***

# झुंबररावांचा कर्दनकाळ!

एक होतं झाड. आंब्याचं. एवढं उंच की खालून आभाळाला लागलंय असं वाटे. या झाडाला अगणित फांद्या होत्या. एका फांदीला दुसरी, दुसरीला तिसरी असं करीत ते झाड आपलं चहू बाजूंनी अफाट पसरलं होतं. त्यामुळे झालं काय, सर्व तऱ्हेच्या पाखरांना बसायला, गप्पा मारायला, खेळायला ते आपलं एक खेळांगणच बनलं!

कित्येक पाखरांनी आंब्याच्या या झाडावर आपली घरटी पण बांधली. सर्वांत उंच घरटं होतं घारीच्या पिल्लांचं.

आता घारीचं आपणाला ठाऊकच आहे. शिकार शोधण्यासाठी तिला आभाळात उंच जाऊन घिरट्या घालीत राहावं लागतं. घिरट्या घालीत राहायचं. खाली कुठे उंदीर, पाखराचं पिल्लू वगैरे दिसलं की झुपकन् खाली यायचं. ते पिल्लू पकडायचं, झाडावर आणायचं आणि आरामात बसून खाऊन टाकायचं. तर अशा घिरट्या घालून कंटाळली की ती आपली या झाडावर येऊन बसू लागली. तिला ते आपलं जवळच्या जवळ छानच झालं होतं. तुमच्या आईचं ऑफिस कसं, घराजवळच असतं? तसं.

घारीची नजर म्हणजे तर काय? सर्व पक्ष्यांत तीक्ष्ण! आकाशातून तिला खालची मुंगी सुद्धा दिसते म्हणजे बघा. म्हणूनच आपल्या शिकारीचे छोटे-मोठे प्राणी ती आकाशातूनच हेरते. एवढ्या उंच आकाशातून खाली बेडूक, उंदीर, चिमण्या यांचं काय काय चाललंय हे तिला चांगलं कळतं. तिचा नेम असला खतरनाक असतो की उडत्या कावळ्याच्या तोंडातला उंदीर सुद्धा ती वरच्यावर झुपकन उठवते. त्यामुळं तिथली सर्व पाखरं तिला जाम घाबरायची.

आंब्याच्या झाडावर राहणारी पाखरं होती, ती काय करायची? आपली शिकार त्या झाडावरच घेऊन यायची. त्यामुळं घारीचं चांगलं फावलं. त्यातलीच एखादी शिकार उठवली की तिचं खाणं होऊन जाई. वर आभाळात जा, उनातानात घिरट्या घाला ही कटकटच उरली नाही. घरट्याशी बसायचं, पोराबाळांशी खेळायचं आणि मनात आलं की मध्येच एकदा खाली नजर टाकायची. कावळा, घुबड, ससाणा कुणी जाताना दिसलं रे दिसलं की बाणासारखं खाली यायचं, त्याच्या तोंडचा घास उठवायचा आणि चालू पडायचं! तिला हटकणार कोण? एक पक्ष्यांचा राजा तो गरुड सोडला तर तिच्यापुढं बोलायची कुणाची टाप होती?

एकदा तर ती एका घुबडाच्या पोरालाच तोंडातल्या उंदरासकट झाडावर घेऊन आली. बघता बघता त्यांचा चट्टामट्टा करून मोकळी! तेव्हापासून झाडावरच्या सर्व पाखरांनी तिचा धसकाच घेतला. त्याच दिवशी झाडावरच्या सर्व पाखरांनी एक गोष्ट पक्की ठरवून टाकली. आपली शिकार आंब्याच्या झाडावर आणायचीच नाही, घारीला दाखवायची पण नाही. काही पाखरांनी तर घारीच्या भीतीनं ते झाडच सोडून दिलं.

आळशी बनलेल्या घारीनं मग काय केलं? तिची नजर पलीकडच्या झुंबरराव पाटलांच्या घराकडे वळली. त्यांच्या कोंबड्यांच्या पिल्लांवर. झुंबरराव पाटील म्हणजे केवढी मोठी असामी? पाटील म्हणजे गावचा राजाच तो! त्यांचं घरही त्यांच्यासारखंच मोठ्ठं. त्यांना काय कमी होतं? कसला तोटा होता? घरी रोज कोंबडीचं जेवण. झुंबरराव पाटलांचं तर कोंबडीच्या सागुतीशिवाय चालतच नव्हतं. त्यामुळं झुंबरराव पाटलांच्या घरी कोंबड्यांना तोटा नव्हता. मणभर कोंबड्या आणि खंडीभर पिलं कायम घरापाशी कलकलत असायची. "चिक चिक – चिक चिक" करीत!

म्हणूनच घारीनं आपला मोर्चा तिकडे वळवला. मनात आलं की झाडावरून पंख पसरायचे आणि खाली जाऊन कोंबडीचं एक पिल्लू उठवायचं. एकानं नाही भूक भागली तर दुसरं, दुसऱ्यानं नाही भागली

तर तिसरं। इथं कुठं तोटा होता? त्यामुळं घारीची आपली मज्जाच
चालली होती

नव्हता. खंडीभर पिल्लं. त्यांतली चार-दोन कुणी उठवली– काय कळणार? पण घारीनं मुळी पिल्लं उठवण्याचा सपाटाच लावला म्हटल्यावर पिल्लांची संख्या झपाट्यानं कमी होऊ लागली. मग मात्र त्यांनी कोंबडी-चोरावर कडक पाळत ठेवली. तेव्हा त्यांना कळून चुकलं– अरे, ही तर आपल्याच आंब्याच्या झाडावरची घार!

आता काय करायचं? कोंबड्यांना दिवसभर कोंडून झाकून कसं ठेवणार? ती घरात कलकलाट करीत बसणार. आणि त्यांना खायला काय देणार घरात डांबून? म्हणजे घारीचाच बंदोबस्त करायला हवा. पण तो कसा करायचा? ती तर तुमचा डोळा चुकवूनच येणार. तिला अडवणार कसं? पाटलाची मुलं आंब्याच्या झाडावर दोन दिवस दगड मारीत बसली होती. पण घारीपर्यंत दगड पोचणार तेव्हा ना?

एका मुलानं घारीचं घरटंच झाडावरून उठवायचा घाट घातला. पण त्याची आई म्हणाली, "अजिबात नको. घरटं राहील झाडावर, आणि तुम्ही याल खाली! आणि एक लक्षात ठेवा, कावळ्याच्या घरट्याला नुसता हात लागला तरी कावळीण आपणाला टोचून खाते; आणि ही तर घार! कावळ्याच्या चौपट मोठी. तुम्ही अगदी ऐटीत गेलात घरट्याजवळ नि ही आली पंख पसरून तर काय होईल? आंबा पडल्यासारखे खाली पडाल. उगीच नसत्या फंदात नका पडू. त्यापेक्षा कोंबडी खायचं कमी करा. नाही कोंबडी खाल्ली तर मरायला नाही होत!"

यावर झुंबरराव पाटील जाम तडकले. घारीवर जाम वैतागले. म्हणाले, "आमच्या जेवणातली कोंबडी तोडते काय? थांब तू. आज मी तुलाच गोळी घालतो!"

एवढं म्हणून ते थांबले नाहीत. त्यांनी लगेच बंदूक बाहेर काढली. गोळ्या भरल्या. आणि निघाले घारीच्या शिकारीला. पण घार जागेवरच नव्हती. पाटील आणखीनच वैतागले. मग त्यांनी काय केलं? घारीच्या

घरट्यावरच गोळी झाडली!

ठोऽऽऽ–!

प्रचंड आवाज झाला. झाडावरची एकजात सगळी पाखरं पळत सुटली. घारीचं घरटं तर काड्या काड्या होऊन खाली आलं. झुंबरराव पाटील एकदम खूष झाले. टाळी वाजवून घारीला म्हणाले, "जा बोंबलत. तुझं घर जमीनदोस्त केलं. खबरदार पुन्हा इथं घर बांधशील तर!"

घार नाक उडवून म्हणाली, "मूर्ख मनुष्या, तुला एवढं पण कळत नाही?"

"काय?" झुंबररावांनी काहीच न कळून विचारलं.

"की घर घारीचं नसतं हे? हे असतं तिच्या पिल्लांचं घरटं! घ-र-टं! कळलं?"

"पिल्लांचं?" झुंबररावांनी विचारलं. "मग आहेत कुठे ती?"

"ती केव्हाच मोठी होऊन लांब राहायला गेली. म्हणूनच तुझ्या तडाख्यातून सुटली." मग आपल्या पोरांचं घरटं उडवणाऱ्या झुंबररावांवर आग पाखडून घार ओरडली. "ए झुंज्या, भडभुंज्या, खडकुंज्या, घार घरट्याच्या चार काटक्यांत मावते काय? त्या गेल्या म्हणून माझं काही बिघडणार नाही. मी इथेच राहणार. आणि नीट ऐक, तुझ्या कोंबडीची पिल्लं फस्त करणार! एक पण सोडणार नाही!"


एवढं म्हणून घार थांबली नाही. दुसऱ्या दिवशी तिनं त्यांतली दोन पिल्लं उठवली. आता मात्र झुंबरराव पाटील भलतेच म्हणजे भलतेच भडकले. म्हणाले, "घारडे, थेरडे, बेरडे! आता मात्र मी तुलाच शिल्लक ठेवत नाही. मी झुंज्या-भडभुंज्या काय? फार माजलीयस माझ्या झाडावर राहून. पण लक्षात ठेव, तुला ठार करीन तरच नावाचा झुंबरराव पितांबरराव पाटील!"

मग झुंबररावांनी आंब्याच्या झाडाखालीच मुक्काम ठोकला. पण घार आंब्याच्या झाडावर येतच नव्हती. झुंबररावांनी तिला बजावलं, "आत्ता नाही दुपारी, दुपारी नाही संध्याकाळी, केव्हा तरी झाडावर येशीलच की नाही? ये तर खरी. आज तुझा मी कायमचा निकालच लावतो! एक तर

मरायला तरी तयार हो, नाही तर झाड सोडून चालती हो!''

आणि वाघाबिघांचे शिकारी मचाण ठोकून वाघाची शिकार करायला बसतात ना? तसे झुंबरराव दबा धरून बसले. जाम हलणार नाही म्हणून.

पण तेवढ्यात काय झालं? समोरच्या रानातून एक साप आला आणि झुंबररावांच्या आवारात उतरला. साप म्हणजे नावाचा साप नव्हे– सर्पराज! फणा उभारून समोर ठाकणारा महाभयंकर प्राणी! ज्याला नुसतं पाहून आपल्या छातीत धडकी भरते किंवा चड्डी पिवळी होते ते नागाधिराज!



लेचापेचा कुणी असता तर त्याला पाहूनच पळत सुटला असता. पण झुंबरराव पाटील लेचेपेचे नव्हते. वाघासमोर छाती काढून उभा राहणारा जिगरबाज मनुष्य तो. तो काय त्या सरपटवाराला दाद देणार? शिवाय झुंबररावांकडे एवढी मोठी बंदूक! ते काय केपं उडवणारं नळकांडं होतं?

म्हणूनच झुंबररावांनी नेम धरला आणि दिल्या दोन गोळ्या सोडून त्या फणाबहाद्दरावर! पण फणाबहाद्दराला झुंबररावांची चाहूल आधीच लागली की काय कोण जाणे! त्यानं आधीच लढाईतून पळ काढला, आणि एकाएकी कुठे गडपच झाला. बिळात भरला की

घरट्यावरच गोळी झाडली!

ठोऽऽऽ–!

प्रचंड आवाज झाला. झाडावरची एकजात सगळी पाखरं पळत सुटली. घारीचं घरटं तर काड्या काड्या होऊन खाली आलं. झुंबरराव पाटील एकदम खूष झाले. टाळी वाजवून घारीला म्हणाले, "जा बोंबलत. तुझं घर जमीनदोस्त केलं. खबरदार पुन्हा इथं घर बांधशील तर!"

घार नाक उडवून म्हणाली, "मूर्ख मनुष्या, तुला एवढं पण कळत नाही?"

"काय?" झुंबररावांनी काहीच न कळून विचारलं.

"की घर घारीचं नसतं हे? हे असतं तिच्या पिल्लांचं घरटं! घ-र-टं! कळलं?"

"पिल्लांचं?" झुंबररावांनी विचारलं. "मग आहेत कुठे ती?"

"ती केव्हाच मोठी होऊन लांब राहायला गेली. म्हणूनच तुझ्या तडाख्यातून सुटली." मग आपल्या पोरांचं घरटं उडवणाऱ्या झुंबररावांवर आग पाखडून घार ओरडली. "ए झुंज्या, भडभुंज्या, खडकुंज्या, घार घरट्याच्या चार काटक्यांत मावते काय? त्या गेल्या म्हणून माझं काही बिघडणार नाही. मी इथेच राहणार. आणि नीट ऐक, तुझ्या कोंबडीची पिल्लं फस्त करणार! एक पण सोडणार नाही!"

एवढं म्हणून घार थांबली नाही. दुसऱ्या दिवशी तिनं त्यांतली दोन पिल्लं उठवली. आता मात्र झुंबरराव पाटील भलतेच म्हणजे भलतेच भडकले. म्हणाले, "घारडे, थेरडे, बेरडे! आता मात्र मी तुलाच शिल्लक ठेवत नाही. मी झुंज्या-भडभुंज्या काय? फार माजलीयस माझ्या झाडावर राहून. पण लक्षात ठेव, तुला ठार करीन तरच नावाचा झुंबरराव पितांबरराव पाटील!"


मग झुंबररावांनी आंब्याच्या झाडाखालीच मुक्काम ठोकला. पण घार आंब्याच्या झाडावर येतच नव्हती. झुंबररावांनी तिला बजावलं, "आत्ता नाही दुपारी, दुपारी नाही संध्याकाळी, केव्हा तरी झाडावर येशीलच की नाही? ये तर खरी. आज तुझा मी कायमचा निकालच लावतो! एक तर

मरायला तरी तयार हो, नाही तर झाड सोडून चालती हो!''

आणि वाघाबिघांचे शिकारी मचाण ठोकून वाघाची शिकार करायला बसतात ना? तसे झुंबरराव दबा धरून बसले. जाम हलणार नाही म्हणून.

पण तेवढ्यात काय झालं? समोरच्या रानातून एक साप आला आणि झुंबररावांच्या आवारात उतरला. साप म्हणजे नावाचा साप नव्हे– सर्पराज! फणा उभारून समोर ठाकणारा महाभयंकर प्राणी! ज्याला नुसतं पाहून आपल्या छातीत धडकी भरते किंवा चड्डी पिवळी होते ते नागाधिराज!

लेचापेचा कुणी असता तर त्याला पाहूनच पळत सुटला असता. पण झुंबरराव पाटील लेचेपेचे नव्हते. वाघासमोर छाती काढून उभा राहणारा जिगरबाज मनुष्य तो. तो काय त्या सरपटवाराला दाद



देणार? शिवाय झुंबररावांकडे एवढी मोठी बंदूक! ते काय केपं उडवणारं नळकांडं होतं?

म्हणूनच झुंबररावांनी नेम धरला आणि दिल्या दोन गोळ्या सोडून त्या फणाबहाद्दरावर! पण फणाबहाद्दराला झुंबररावांची चाहूल आधीच लागली की काय कोण जाणे! त्यानं आधीच लढाईतून पळ काढला, आणि एकाएकी कुठे गडपच झाला. बिळात भरला की

जमिनीत गायब झाला काही कळेना. झुंबरराव पाटलांनी इकडून तिकडून खूप रान तुडवलं, पण काही पत्ता लागेना.

मग मात्र झुंबरराव पेचात पडले. एकाएकी त्यांच्या पोटात भीतीचा गोळा उभा राहिला. का माहीत आहे? सापानं आत्ता अशी माघार घेतली, तो दडी मारून बसला तरी एक नंबरचा दगाबाज प्राणी तो! आपणाला जर कुणी दुखावलं तर म्हणे त्याचा तो दावा धरतो, डूख धरतो. आणि मागाहून कुठे तरी भलत्या जागी बेसावध गाठून त्याचा काटा काढतो. म्हणजे दंश करून पळ काढतो. त्याचा दंश म्हणजे काय? खलास! माणूस संपलाच तिथे!

आणि झुंबररावांनी त्याला असंतसं दुखवलं नव्हतं. त्यांनी तर त्याला गोळ्या झाडल्या होत्या. जमिनीसकट त्याला हादरवून टाकलं होतं. म्हणजे आपला डूख तो धरल्याशिवाय कसा राहील? आता आपणाला तो कुठे ना कुठे गाठून काढील– आणि आपला सूड घेईल. हे मनात आल्यावर झुंबरराव तिथे थांबलेच नाहीत. घारीची शिकार तिथेच टाकून सरळ घरी आले.

त्यांनी नोकराचाकरांना त्या रानात पाठवलं. सगळं रान पिंजून काढायला लावलं. पण फुकट!. सापाचा छडा लागलाच नाही. दिवसभर झुंबरराव आपले घरात बसून. तेही खाली नाही, वर माडीवर. त्यांच्या काही मित्रांनी त्यांना हेही सांगितलं की, साप दावा धरतो, डूख धरून राहतो हे सर्व खोटं आहे, कपोलकल्पित आहे. सापाला कान नसतात, त्याला ऐकू येत नाही, वगैरे खूप सांगून पाहिलं. पण पाटलांच्या मनातली भीती जात नव्हती.

त्या दिवशी त्यांनी आपलं जेवणखाण माडीवरच केलं. खाली उतरलेच नाहीत. माडीवरून घरासमोरचं आवार दिसत होतं, तिकडेच नजर लावून बसले. तो कुठेही दिसला की नोकराचाकरांनी लाठ्याकाठ्या घेऊन जायचं आणि त्याला ठार करायचं, अशी सर्वांना सक्त ताकीद देऊन ठेवलेली होती त्यांनी.

त्यांचा अंदाज बरोबर निघाला. गडप झालेला तो साप संध्याकाळच्या

वेळी पुन्हा अवतरला. सकाळी दिसला होता तिथूनच सरपटत निघाला होता. जमीन हुंगत चालला होता. झुंबरराव दचकले. त्यांना वाटलं, तो आपलाच वास काढत असणार. झुंबररावांनी लगेच आपल्या नोकरांना इशारा केला. ते स्वतः बंदूक घेऊन खाली आले.




पण काय आश्चर्य? पुढं कुणाला काही करावं लागलंच नाही. अकस्मात झाडावरची ती घार खाली आली आणि सापाला दोन पायांच्या पंज्यात पकडून घेऊन गेली. तिची पकड एवढी मजबूत होती की हा साप आहे की घारीला लांबलचक शेपटी फुटली आहे कळत नव्हतं. तिच्या पंज्याच्या पकडीत तो जाम अडकून पडला होता.

त्याला घेऊन घार उडाली ती आंब्याच्या त्या उंच झाडावर जाऊन बसली. एकदा पुन्हा आपली सापावरची पकड तिनं घट्ट करून घेतली, आणि मग तिनं त्याचा समाचार घ्यायला सुरुवात केली. त्याचा एकेक तुकडा करून तोंडात टाकू लागली. ते दृश्य झुंबरराव पाटील डोळे भरून पाहत होते. त्यांच्या आनंदाला पारावार उरला नव्हता.

दिवसभर एवढा महाभयंकर बनलेला तो साप! काय? तर म्हणे सर्पराज– नागाधिराज! झुंबरराव पाटलांचा तर तो कर्दनकाळ बनला होता. केवढे घाबरून बसले होते ते दिवसभर? जीव मुठीत घेऊन?– आणि घार केवढी? झुंबररावांच्या एका मांडीएवढी! आणि तरी तिनं त्या सर्पराजाची खांडोळी खांडोळी करायला घेतली होती. बघता बघता तिनं त्या कर्दनकाळाचं पडवळच करून टाकलं!

झुंबररावांच्या पोटात आता आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. टाळ्या

वाजवून नि हाका मारून त्यांनी घरातल्या सर्वांना जवळ बोलावलं. आंब्याच्या झाडावर बसलेल्या घारीच्या पायात अडकलेला तो भयंकर प्राणी दाखवला. म्हणाले, "आता पाहा, कसा दोरीसारखा लोंबतोय घारीच्या पायाशी!"

घारीवर ते एवढे खूष झाले, एवढे खूष झाले की ताबडतोब त्यांनी सर्वांना हुकूम सोडला–

"आजपासून कुणीही घारीच्या वाटेला जायचं नाही. कोंबडीची पिलंच काय, आपल्या सगळ्या कोंबड्या तिनं उठवल्या तरी!"

त्या दिवसापासून ती घार त्यांच्या घरादाराची राखणदार बनली. झुंबरराव तिला म्हणाले,

"ए घारुबाई, आजपासून हे आंबझाड तुझं! तुला आता कुणीही हात लावणार नाही. वाकडी मान करून तुझ्याकडे बघणार पण नाही!"

***

# पडत्या फळाची आज्ञा

एका घरात दोनच माणसं होती. घरमालक आणि त्यांची बायको. त्यांना मूलबाळ नव्हतं. घरमालक दिवसभर शेतात काम करायचे. मालकीणबाई घरात राहून संसार करायच्या. पण घरमालक शेतावर गेले की घरात मालकीणबाई एकट्याच. एवढ्या मोठ्या घरात एकटी बाई म्हणजे अख्ख्या मैदानात एकच झाड असावं तसं वाटायचं. एकटी बाई घरात, घराबाहेर कुठं कुठं म्हणून लक्ष ठेवणार? बाहेर चोर येऊन काही वस्तू पळवून गेला तर कळणार कसं?

म्हणून मालकीणबाईंच्या सोबतीसाठी, घरादारावर पहारा करण्यासाठी मालकांनी घरी एक कुत्रा आणला. मस्त छोटेखानी कुत्रा. अंगावर काळेपांढरे ठिपके. डोळे एकदम बारीक. पण कान लांब होते. ते पाहून मालक त्याला म्हणायचे, "ए शिरपा, लेका तू कुत्रा हायेस का गाढाव?"

शिरपा काय बोलणार? त्याला एवढं कळायचं की मालक आपल्यावर खूष आहेत, आपली मस्करी करताहेत. तोही मग खूष होऊन दोन हात वर उचलून मालकांच्या छातीवर ठेवायचा, आणि एवढी लांब जीभ काढून हा हा करीत राहायचा.

मालक म्हणायचे, "हसतो कशाला रे?– हा हा करून?"

शिरपा मग तोंड मिटून खाली उतरायचा. त्याला वाटायचं, आपण छातीवर चढलो म्हणून मालक रागावताहेत. तेवढ्यात त्याच्या नाकावर माशी नाही तर डास बसायचा. शिरपा त्यांना खाऊ की गिळू करायचा. तोंडानं त्यांचा 'कॅच' पकडायला जायचा. ते जाम मिळायचे नाहीत. हा त्याचा नि माशीचा लपंडाव पाहायला काय मज्जा यायची!

शिरपा केव्हाही, कुठेही, काहीही करीत असला, खेळत-पळत-लोळत असला तरी त्याचे कान कायम टपलेले. कुणी परकीसरकी दिसलं की सुटला भुंकत. चोर-लफंगा, भंगड-भुक्कड कसलाही माणूस तो बरोबर ओळखून काढी. अशा माणसाला तो अजिबात थारा करायचा नाही. कोण माणूस चांगलं, कोण वाईट ते त्याला कसं कळायचं कोण जाणे?

एक दिवस काय झालं? घरमालक हातात बटर दडवून त्याला हुलकावण्या देत होते. हा जीव तोडून उड्या मारतोय. एवढ्यात याच्या नाकात कसला तरी वेगळाच वास भरला. लगेच याचं नाक फेंदारलं. कान सरळ रेषेत उभे राहिले आणि एकाएकी बटरची पर्वा न करता हा बाहेर धावत सुटला.

त्याचा अंदाज बरोब्बर निघाला. बाहेरच्या फाटकात एक मांजर आलं होतं. पाठीवर करड्या आणि तोंडावर पांढऱ्या शुभ्र रंगाचं. होतं केवढं? शिरपाच्या तोंडाएवढं. पण रुबाब वाघाच्या मावशीचा. नजर चौफेर लागून राहिलेली. मनात विचार एकच. आत यावं का? कुणी पाहतंय का? कुणी ओरडतंय का?

एवढ्यात आतून शिरपा समोर येऊन उभा. तो काय या नव्या



प्राण्याला सरळ आत येऊ देणार? तो त्याच्यावर जाम भुंकत सुटला. . . भुक् भुक् भुक्– भुभूभू. . .

पण फाटकातलं मांजरही कमी नव्हतं. हा किती भुंकला तरी जाम हलत नव्हतं. आपली जागा सोडीत नव्हतं. हा आपला भुंकतोय, अंगावर झेपा घेतोय, खाऊन टाकीन म्हणून तोंड जवळ नेतोय, पण मांजर त्याला जाम हटत नव्हतं. उलट नखं बाहेर काढून त्यालाच गुरकावतंय– "खबरदार पुढं येशील तर! ओरबाडून काढीन वाघनखांनी! वाघाची मावशी आहे मी!"

ते पाहून घरमालकीण बाई बाहेर आल्या. पाहतात तर फाटकाशी अंगाचं मुटकुळं करून एक छान छोटं मांजर बसलेलं. कुत्र्यावर रोखलेले हिरवे जर्द डोळे, फेंदारलेलं नाक, फुगवून ताठ केलेला एवढा मोठा शेपटा. . . काय रुबाब त्याचा! केवढं धाडस! एवढ्या मोठ्या कुत्र्याशी लढायला सज्ज. एक पाऊल मागं हटत नव्हतं की कुत्र्यावर रोखलेली नजर काढीत नव्हतं. मालकीण बाईंना हे मांजर भारी आवडलं. त्यांनी शिरपालाच दम दिला–"कशाला रे भुंकतोयस त्याच्यावर? ते केवढं नि तू केवढा? आणि कित्ती छान आहे! त्याच्याशी खेळायचं की त्याच्यावर खेकसायचं? चल, चालता हो तिकडे! हात लावायचा नाही त्याला."

तिकडे मालकीण बाई कुत्र्याला दटावताहेत ही संधी साधून त्या मांजरानं काय केलं? पटकन उडी मारली आणि जी धूम ठोकली ती त्यांच्याच घरात! मांजर आपल्याच घरात घुसलंय हे पाहून मालकीण बाई एकदम खूष. त्याच्या मागून त्या पळत सुटल्या. घरात जाऊन त्यांनी त्या मांजराला हुडकून काढलं. ते बसलं होतं जिन्याखालच्या काळोखात दडून.

तशा मालकीणबाई घरात गेल्या. वाटीतनं दूध घेऊन आल्या. पण त्यांच्यामागोमाग कुत्रा होता. तो भुंकायचा थांबत नव्हता. मांजर पुढं येणार कसं? मालकीण बाईंनी ते पाहिलं, तसा कुत्र्याला त्यांनी दम दिला. तरीही तो हटेना, तसा त्याच्या पाठीत त्यांनी एक फटका चढवला.

म्हणाल्या, "लाथ घालीन कंबरड्यात पुढं येशील तर! कळलं?"

मालकीण बाईंनीच एवढा दम दिल्यावर शिरपाला मागं हटणं भाग होतं. तो मागं हटला तसं मांजर पुढं आलं. वाटीतलं दूध प्यायलं. ते पिऊन झाल्यावर काय? बाई वाटच पाहत होत्या. त्यांनी त्याच्या पाठीवरून प्रेमाचा हात फिरवला आणि घेतलं उचलून वर! शिरपाच्या नाकावर टिच्चून त्याला त्या घरात घेऊन गेल्या.

शिरपाला ते मुळीच आवडलं नाही. आपणाला हाकलून मालकीणबाई त्याचे लाड करताहेत याचं त्याला फार वाईट वाटलं. रागही आला. पण राग काढणार कुणावर? मालकीणबाईंवर राग कसा काढणार? त्या कंबरड्यात लाथ घालतील!

मालकीणबाईंनी त्या मांजराचं तेवढ्यात नाव पण ठेवून टाकलं. बंडी! मोठी बंडखोर ना? म्हणून बंडी! दिवसभर सारखं बंडी–बंडू–बंडा–बंडोबा! बंडी बघतेय कशी नि बंडी नाचतेय कशी?– याशिवाय बाईंना दुसरा विषय उरला नाही. येईल-जाईल त्याला दाखवायचं आणि त्याचंच कौतुक करीत बसायचं. शिरपाकडे लक्षच नाही.

शिरपाला हे मुळीच सहन झालं नाही. दुपारी शिरपाला जेवण पण मिळालं नाही. बाईंच्या ते लक्षातच नाही. शिरपा कसला चिडला होता? त्यानं काय केलं? दुपारी मालकीण बाई झोपल्याहेत हे पाहून त्यांच्या बंडीला घरातून हुसकून काढलं, पाठच धरली. पण बंडी चढून बसली चिकूच्या झाडावर. शिरपा म्हणाला, "किती वेळ झाडावर बसणार तू?"

बंडी म्हणाली, "वर ये ना– असली हिंमत तर!"

शिरपा वैतागला. म्हणाला, "खाली ये, मग दाखवतो तुला."

पण मांजरानंच त्याला नाक खाजवून दाखवलं. तसं कुत्र्यानं त्याला वेडावून दाखवलं. मांजरानं मग गंमतच केली. कुत्र्याला चिडवणारं एक गाणं सुरू केलं–

*"मी आहे वाघाची मावशी*
*करून टाकीन ऐशी की तैशी!"*

कुत्रा म्हणाला, "वाघाची मावशी आहेस तर खाली ये की. है हिंमत?"

बंडी म्हणाली, "एवढी तुझी हिंमत आहे तर तू वर येऊन दाखव बघू."

एवढ्यात घरातून आल्या मालकीण बाई. शिरपानं आपल्या बंडीला झाडावर नेऊन पोचवलंय हे पाहिल्यावर त्या शिरपावर डाफरल्या. म्हणाल्या, "शिरपा, तुला काही अक्कल आहे का?"

शिरपा भुंकून म्हणाला, "या मांजराला तरी आहे का?"

"जास्त शहाणपणा करू नको." मालकीणबाईंनी शिरपाला दम दिला. "अरे, तुला ती धाकट्या बहिणीसारखी. तू तिचा दादा. तिला संभाळायचं, तिच्याशी खेळायचं की तिला मारायचं?"

"पण मग ती मला नखं कशाला काढून दाखवते? नाक कशाला खाजवून दाखवते? आम्हांला चिडवल्यावर आम्ही कां म्हणून गप्पं बसायचं? मला ती काय म्हणते माहीत आहे का?"

"काय?" मालकीणबाईंनी विचारलं.

"टुकोजी भुंकोजी रिक्कामटेकडे!"

"हो का ग बंडे?" बाईंनी माऊला विचारलं.

"मग एकसारखा मागं का लागतो तो माझ्या?" बंडीनं विचारलं.

"हो का रे शिरपा?"

"मग आपलं कामच आहे ते." शिरपा म्हणाला. "नवीन कुणी आलं की त्याच्यावर लक्ष ठेवायचं, पहारा करायचा."

"हो, पण तो चोरबीर असला तर. आमचं माऊ काय चोर आहे?"

"ते आपणाला काय ठाऊक?" शिरपा म्हणाला, "पाहुणा नवीन असेपर्यंत आम्हांला त्याच्यावर लक्ष ठेवावंच लागतं. मग ते माणूस असो नाही तर माऊ."

"हे बघ, जास्त हुषारी करू नको." असं शिरपाला बजावून बाईंनी बंडीला मांडीवर घेतलं. तिच्या पाठीवरून कौतुकानं हात फिरवला.

आणि म्हणाल्या, "आमची गुणाची ग माउली ती!" मग शिरपाला म्हणाल्या, "हे बघ, नवा पाहुणा आम्ही एकदा घरात घेतला, त्याच्याशी आमची गट्टी जमली की तुझं काम संपलं. मग त्याच्या मागं लागायचं नाही. कळलं?"

"कळलं."

"मग चला आता बाहेर."

असं म्हणून शिरपाला त्यांनी बाहेर घालवून दिलं. मालकीण बाईंपुढं बोलणार काय? त्यावर माऊनं त्याला हळूच नाक खाजवून दाखवलंच. तोही मग हळूच म्हणाला, "बाहेर ये हिंमत असली तर!" आणि रागानं बाहेर निघून गेला.

"याद राख." बाईंनी त्याला पुन्हा एकदा दम दिला. "जर का पुन्हा बंडीची कळ काढलीस तर माझ्याशी गाठ आहे, लक्षात ठेव. फटके मिळतील!"

शिरपाला फारच राग आला. सारखं त्या बंडीचं कौतुक आणि आपली हकालपट्टी. संध्याकाळी मालक आले. भुंकत भुंकत त्यानं आपली तक्रार त्यांच्याजवळ मांडली. मालक समजले. याचं काही तरी बिनसलंय.

"का रे? काय झालं?" मालकांनी जवळ घेऊन त्याला विचारलं.

"सारखं ती बंडी की खंडी– तिचं कौतुक. तिला सारखं आपल्याजवळ आणि आम्हांला मात्र घराबाहेर." शिरपाचं ते सांगणं मालकांना लगेच कळलं. कारण त्याच वेळी मालकीणबाई मांजराला छातीशी घेऊन तिथं आल्या. ते पाहून कुत्रा जोरात भुंकला. म्हणाला, "तुम्हीच बघा. माझं म्हणणं खोटं असेल तर!"

मालकीणबाई हसल्या. म्हणाल्या, "काय माझ्याबद्दल तक्रार सांगतोय ना?"

मालकांनी शिरपाला जवळ घेतलं, थोपटलं. म्हणाले, "हे बघ, तू घरात जातोसच कशाला? आपलं काम काय? चोर पकडायचं. हल्ली

किती दिवसांत तू चोर पकडलेला नाहीस? सांग बघू.''

शिरपाला काही सांगता येईना. पकडलेलाच नाही तर सांगणार काय?

मालक म्हणाले, ''पूर्वी तू दर महिन्या-दोन महिन्याला चोर पकडायचास. आता वर्ष झालं, एक तरी चोर पकडलायस का तू?''

शिरपा गप्प.

मालक म्हणाले, ''बघ, तुला आठवत पण नाही. तू आपलं कामच विसरून गेलायस. तू राहतोस लोळत आळशासारखा. एक मोठ्ठा चोर पकडून दे. म्हणजे बघ– अरे या बाईच काय, अख्खा गाव तुझं कौतुक करील. तुला पाहिलं की प्रत्येक जण एकच म्हणणार–''

''काय?'' त्यानं नजरेनंच मालकांना विचारलं.

''म्हणणार– हाच तो बरं का? खंडेराव दाभाड्यांचा शिरपा– चोरांचा कर्दनकाळ! असं काय तरी मोठ्ठं काम कर रे! त्या मांजराच्या नादाला काय लागतोस लेका?''

शिरपाला मालकांचं म्हणणं कळलं. त्यांच्या म्हणण्याचा मतलब समजला. पण त्याचं म्हणणं मालकाला कळलं नाही. त्याचं म्हणणं काय? चोर आला तर पकडायचा ना? आपल्या धास्तीनं चोर इकडे फिरकतच नाहीत, तर पकडणार कसा?

त्यानंतर चारच दिवसांची गोष्ट. मालक-मालकीण दोघंही गेली गावात लग्नाला. घराचा पहारा शिरपावर सोपवून. बाहेर शिरपा आणि घरात मालकीण बाईंची लाडकी बंडी.

पण मालक मंडळी बाहेर पडून खूप वेळ झाला तरी मांजराच्या पोराचा पत्ता नाही. शिरपा आपला बाहेर सगळीकडे फिरतोय, पहारा करतोय. पण त्याचा कुठे आवाज नाही की पायरव नाही. हे घरात करतंय काय? शिरपाला चैन पडेना. आत जाऊन पाहावं तर मुख्य दरवाजा बंद. खिडकी तेवढी उघडी. कशाला? तर मालकीण बाईंच्या लाडक्या बंडीला घराबाहेर पडायला, हिंडाफिरायला वाट हवी ना?

पण एवढी वाट ठेवली तरी ही बाहेर कां येत नाही? दररोज त्या खिडकीतनं सतरा फेऱ्या घालीत असते. आणि आज काय झालं हिला? ही घरात बसून करतेय तरी काय? शिरपाला चैन पडेना.

शेवटी तो त्या खिडकीशी जाऊन उभा राहिला. कान टवकारून त्यानं आतला कानोसा घेतला. पण कसलाच आवाज नाही. तसा तो पुढले पाय खिडकीला लावून उभा राहिला. पण तिथून आतलं काही दिसेना. आत डोकावणार कसं? मग शिरपानं खिडकीवर उड्या मारायला सुरुवात केली. पण एकही उडी खिडकीपर्यंत पोचत नव्हती. आता काय करावं? तेवढ्यात त्याला शेजारच्या घरचा मुलगा दिसला. त्यानं त्याला



गाठलं आणि भुंकत भुंकत "तुला दाखवतो ये–" म्हणून त्याला आपल्या घरी आणलं. परत आल्यावर शिरपानं पुन्हा खिडकीशी उड्या मारायला सुरुवात केली.

शेजारच्या मुलाला कळेना याला काय हवंय? हा एवढ्या उड्या मारून आपणाला काय सांगतोय? काय दाखवतोय? तो मुलगा मग खिडकीशी गेला. त्यानं काय केलं? शिरपाला उचलून घेतलं आणि खिडकीत नेऊन ठेवलं. दोघेही आत डोकावून पाहतात तर काय?

आत मांजर आपलं दुधाची पातेली चाटून पुसून साफ करतंय. ते पाहिल्यावर काय शिरपा गप्प

बसणार? त्यानं तिथूनच भुंकायला सुरुवात केली. दाणकन खाली उडी टाकली आणि आपला भुंकतच सुटला सगळीकडे.

शेजारचा मुलगा म्हणाला, "तुझे मालक घरात नाहीत. भुंकून उपयोग काय? ते आले की सांगू ना आपण त्यांना! तिथपर्यंत तू आमच्याकडे चल ना खेळायला."

पण शिरपा काही ऐकून घ्यायला तयार नव्हता. दुपारी मालक-मालकीण घरी येईपर्यंत हा आपला फेऱ्या मारतोय आणि सारखा खिडकीजवळ जाऊन भुंकतोय. मालकांना पाहिल्यावर काय? धावतच सुटला.

मालकांना कळेना, हा एवढा नाचतोय कां आणि भुंकून सांगतोय काय? ते फाटक उघडून आत आले आणि त्यांनी घराचा दरवाजा उघडला. त्याबरोबर काय, शिरपानं चार उड्यांत स्वयंपाकघर गाठलं आणि पुन्हा भुंकत सुटला.

मालक आणि मालकीणबाई तिथं येऊन पाहतात तर काय? दुधाची पातेली रिकामी. आत दुधाचा थेंब नाही. पातेलीचं झाकण बाहेर पडलेलं. मालकीण बाईंना काय बोलावं कळेना. म्हणजे उडी मारून या बयेनं ती झाकणी उलथून दिलेली दिसते!

मालक मालकीण बाईंना म्हणाले, "तुमची बंडी चोरटी निघाली! आमच्या शिरपानं बरोब्बर पकडलं!"

मालकीण बाईंना फार वाईट वाटलं. रागही आला. "आहे कुठे ती?" म्हणून दोघंही सर्वत्र पाहू लागली. ती काय शोधताहेत ते शिरपाला बरोब्बर कळलं. तो भुंकत सुटला. शेवटी मालकांच्या झोपायच्या खोलीत ती सापडली. त्यांच्याच गादीवर आरामात लोळतेय! मालकीण बाईंचा आवाज ऐकल्यावर आली लाळ घोटीत पुढं. उचलून घ्या म्हणून! पण मालकीण बाईंनी पाठीत एक धपाटा घातला. तर लागली उलटून गुरगुरायला त्यांच्याच अंगावर!

मग काय? मालकीण बाई आणखीनच चिडल्या. म्हणाल्या, "वाः!

चोर तो चोर आणि वर शिरजोर? चालती हो या घरातून. तुझे लाड केले, अंगाखांद्यावर खेळवलं, त्याचे चांगले पांग फेडलेस!''

आणि काय आश्चर्य? मालकीण बाईंनी शिरपालाच ते काम सांगितलं, ''शिरपा, घालवून लाव तिला आत्ताच्या आत्ता!– आणि परत आली तरी अजिबात घेऊ नकोस घरात! चोरटी मेली!''

शिरपाला दुसरं काय हवं होतं? पडत्या फळाची आज्ञा म्हणून त्यानं लगेच झेप घेतली, आणि चार उड्यांत तिला घालवून लावलं. तो खूष झाला. किती तरी दिवसांनी शिरपाला आपलं राज्य परत मिळालं होतं. त्याचं एकट्याचं राज्य!

***

IRBK-0130606